# चिन्हे व स्थान

सुमारे 5000 वर्षांपूर्वी बॅबिलोनिया– म्हणजे आजचे इराक– मधील लोक 60 च्या परिमाणात मोजत असत. 1 ते 59 या आकड्यांसाठी ते निरनिराळी चिन्हे वापरत असत आणि शून्यासाठी एक स्थान रिकामे सोडत असत. संख्या जर खूप मोठी असेल, तर प्रत्येक चिन्हाच्या स्थानाने 60 चा गट दर्शवला जात असे, किंवा 60 × 60, वगैरे वगैरे...



चित्रातील चिन्हात 72 दर्शवले आहे. पहिले चिन्ह 60 चा एक गट दर्शवते. नंतरच्या तीन चिन्हांद्वारे 12 ही संख्या दर्शवली आहे. आपण एक तास 60 मिनिटांत विभागतो आणि एक मिनिट 60 सेकंदात, यात याच प्रकारच्या मोजण्याच्या पद्धतीचा वापर केला आहे.